c|3

जा.क्र.मसंके/उ.क.ना.फ./६९/ /२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
ता. दापोली, जि. रत्नागिरी
दिनांक- 01 JUN 2023

प्रति,

मा. व्यवस्थापक
कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष
डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जि. रत्नागिरी.

**विषय : दरपत्रक नोटिस प्रसिद्ध करणेबाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये आपणास कळविण्यात येते की, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,अधिनस्त उष्ण कटिबंधातील नावीन्यपूर्ण परदेशी दुर्मिळ पिके (रामबुतान, ड्युरियन, लोंगन, स्टारफ्रूट, मॅंगोस्टीन ) प्रक्षेत्रावरील कामे ठेका पद्धतीने करावयाची आहेत तरी याबाबतची जाहिरात प्रसिद्धी विद्यापीठ संकेतस्थळावर ( www.dbskkv.org ) करणेस विनंती आहे. सोबत प्रसिद्धी नमुना जोडण्यात येत आहे.

आपली विश्वासू,

सहाय्यक उद्यानविद्यावेत्ता
कंदपिके संशोधन योजना
म.स.कें,वाकवली

Scanned with OKEN Scanner

८१

# डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली.
## मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
## ता. दापोली, जि. रत्नागिरी

जा.क्र.म.स.के./उ.क.ना.पिके / ठेका/ ६५ /२०२३ दि. 01 JUN 2023

## जाहीर नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अधिनस्त उष्ण कटिबंधातील नाविन्यपूर्ण परदेशी दुर्मिळ पिके १ एकर प्रक्षेत्रावरील कामे ठेका पद्धतीने करावयाची आहेत. त्या कामाचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | करावयाच्या कामाचा तपशील | कालावधी | आवश्यक मनुष्यबळ |
|---|---|---|---|
| १) | उष्ण कटिबंधातील नावीन्यपूर्ण फळझाडे (रामबुतान, ड्युरियन, लोंगन, स्टारफ्रूट, मँगोस्टीन) फळझाडांमधील तण काढणे व त्यांच्या वाढीनुसार सपोर्ट लावणे. | ०१/०७/२३ ते ३१/०७/२३ | ४१ |
| २) | उष्ण कटिबंधातील नावीन्यपूर्ण फळझाडे (रामबुतान, ड्युरियन, लोंगन, स्टारफ्रूट, मँगोस्टीन) फळझाडांतील उंचवट्यावरील तण काढणे व खते देणे. | ०१/०८/२३ ते ३१/०८/२३ | ४१ |
| ३) | उष्ण कटिबंधातील नावीन्यपूर्ण फळझाडे प्लॉट सभोवार तणनाशकाची फवारणी करून उष्ण कटिबंधीय फळपिकांवर बुरशीनाशके व कीटकनाशके यांची फवारणी करणे. | ०१/०९/२३ ते ३०/०९/२३ | ४१ |
| ४) | उष्ण कटिबंधातील नावीन्यपूर्ण फळझाडे (रामबुतान, ड्युरियन, लोंगन, स्टारफ्रूट, मँगोस्टीन) फळझाडांमधील तण काढून मातीची भर देणे. | ०१/१०/२३ ते ३१/१०/२३ | ४१ |
| ५) | उष्ण कटिबंधातील नावीन्यपूर्ण फळझाडे (रामबुतान, ड्युरियन, लोंगन, स्टारफ्रूट, मँगोस्टीन) यांना रिंगा करणे. तसेच खताची मात्रा देऊन रिंगा बुजविणे व फावड्याच्या सहाय्याने मातीची भर देणे. | ०१/११/२३ ते ३०/११/२३ | ४१ |
| ६) | उष्ण कटिबंधातील नावीन्यपूर्ण फळझाडे (रामबुतान, ड्युरियन, लोंगन, स्टारफ्रूट, मँगोस्टीन) यांना उन्हापासून संरक्षण होण्यासाठी सावली करणे. | ०१/१२/२३ ते ३१/१२/२३ | ४१ |
| ७) | उष्ण कटिबंधातील नावीन्यपूर्ण फळझाडे (रामबुतान, ड्युरियन, लोंगन, स्टारफ्रूट, मँगोस्टीन) यांना गांडूळखत व ह्युमिक ॲसिडची ड्रेंचिंग करणे. | ०१/०१/२४ ते ३१/०१/२४ | ४१ |
| ८) | उष्ण कटिबंधातील नावीन्यपूर्ण फळझाडे (रामबुतान, ड्युरियन, लोंगन, स्टारफ्रूट, मँगोस्टीन) या फळपिकांतील तण काढून सपोर्ट लावणे. | ०१/०२/२४ ते २९/०२/२४ | ४६ |
| | | एकूण | ३३३ |

वरील कामे ठेका पद्धतीने एकूण ३३३ मजूर युनिट च्या सहाय्याने दि.०१/०७/२०२३ ते २९/०२/२४ या कालावधी मध्ये करावयाची आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी आपले दरपत्रक दि. १५/६/२०२३ पर्यंत बंद लिफाफ्यात भरून या कार्यालयास पोहोचेल असे पाठवावे.

कृपया मागे पहा...

## ठेकेदारास खालीलप्रमाणे कामाच्या अटी व शर्थी बंधनकारक राहतील

१) ठेकेदाराने ठेकासादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरुप पाहून दरपत्रकामध्ये/दरपत्रक/निविदेमध्ये दर सादर करावेत.

२) ठेका मंजूरी आदेश प्राप्त होताच मंजूरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्न्स्वाशरीकार/ विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधीक्षक यांनी दिलेल्या सूचनानुसार व त्यांचे देखरेखेखाली काम करावयाचे आहे .

३) ठेकेदाराने नेमलेल्या मजुरांना श्रम व रोजगार मंत्रालय नवी दिली यांचा **F.NO. 1/13(1)/2017-LS-11**दिनांक१७.३ .२०१७ च्या अनुषंगाने शासनाच्या किमान वेतन दरानुसार वेतन देण्यात येते ,असे प्रमाणपत्र ठेक्याचे देयक कार्यालयास सादर करतेवेळी देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देयकासोबत नसल्यास देयकाची अदायगीकरण्यात येणार नाही.

४) कामाच्या मजुरीची अदायगी काम पूर्ण झाल्यावर अथवा महिना पूर्ण झाल्यावर करण्यात येईल. संबंधित देयक सादर करताना विभाग प्रमुख /प्रक्षेत्र प्रमुख /प्रक्षेत्र अधीक्षक यांचेकडील कामे वेळेत पूर्ण केलेबाबतचा दाखला देयकासोबत जोडणे बंधनकारक राहील.

५) ठेका अपूर्ण सोडल्यास ठेक्याच्या देयकाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्यावेळी गृहीत धरला जाणार नाही . तसेच संबंधित ठेकेदाराचेदरपत्रक/निविदा पुढील ठेक्याच्या वेळी ग्राह्य धरलेजाणार नाही .

६) प्रक्षेत्रावरदिलेल्यासूचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदारानेकरणे बंधनकारक असेल ,सूचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत बंद केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

७) ठेकेदाराकडेपॅ न कार्ड,आधारकार्ड व बँक खाती तपशिल( छायांकितप्रत) सोबत जोडणे बंधनकारक आहे . ठेकेदाराच्या देयकाची अदायागी त्याचे बँक खाती N.E.F.T./R.T.G.S. करण्यात येईल.

८) ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात /सर्पदंश/विंचूदंश झाल्याश संबंधित कामगारांवर योग्य टे उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाद्वारे करण्यात येणार नाही. प्रक्षेत्र/ कार्यालय काम करतेवेळी काही अपघात /इजा झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही आणिकोणतेही विमा कवच व प्रतिपूर्ती असणार नाही.

९) कामाच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामगाराकडून / मजुरांकडून प्रक्षेत्राच्या माल्मातेचे नुकसान झाल्यास ठेकेदाच्या देयाकामधून संबंधित नुकसानीची किंमत वसूल करण्यात येईल आणि त्यावावत ठेकेदारावर कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्न्स्वक्श्रीकार यांना असेल.

१०) ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवासुविधा तसेच त्याच्या कार्यपद्धतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यातयेईल. कार्यालयाने दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यास ठेकेदारास बंधनकारक

कृपया पुढे पहा ---

सदरचे काम करत असताना प्रक्षेत्र आणि कार्यालय दोंनीही ठिकाणचे कार्यालयीन शिष्टाचार पाळणे बंधनकारक आहे . तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेल्या ठेका कोणत्याही वेळी रद्द करण्याचा निम्नस्वक्श्रीकारयांनी राखून ठेवला आहे.

११) सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या याचिका क्रमांकSLP-5443/90 नुसार ठेकेदाराश किंवा ठेकेदाराने नेमलेल्या मजुरास /इसमास ठेका कालावधीमध्ये /ठेका कालावधी नंतर विद्यापीठ /शासकीय सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाहो व तशा दाखला देण्यात येणार नाही .

१२) ज्या कंपनीस / स्वन्स्थेस/ व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असले बाबत चा करार लिखित स्वरुपात कारणी बंधनकारक राहील . कंपनी/ संस्थेतर्फे/ ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचार्याच्या ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किवा विद्यापीठावर असणार नाही .

१३) शासन निर्णयानुसार पद्धतीप्रमाणे ठेकेदाराचे देयकातून आयकर कपात करणेत येईल .

तरी मागील कामाबाबतची प्रत्यक्ष माहिती मा मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली ,संचालक . ,कंदपिके योजना ता.दापोली यांचे कार्यालयास सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत मिळेल .

सहाय्यक उद्यानविद्यावेत्ता
कंदपिके संशोधन योजना
म.स.कें. वाकवली

प्रत, माहितीसाठी सादर

१) नोटीस बोर्ड मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली

२) नोटीस बोर्ड भासुयो / कंदपिके योजना / वाकवली विभाग, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,